# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail : mcm.dte@gmail.com Internet : http://www.dte.org.in/mcm


**संकेतस्थळ: परिपत्रक**

का.क्र.१८/तंशिसं/अल्प.विभाग/२०१५/६९
दिनांक:- ३१/०३/२०१५

प्रति,
सर्व प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्था व
त्यामध्ये शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी

**विषय :- Aadhaar Card Number (Unique Identification) / विदयार्थ्यांच्या स्वत:च्या बँक खात्या बाबत.**

सर्व संस्था / अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना कळविण्यात येते की,

- **केंद्र शासनाची गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती (मेरीट - कम - मिन्स) योजना**
  (संकेत स्थळ: www.momascholarship.gov.in)

  **व**

- **राज्य शासनाची अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना**
  (संकेत स्थळ: www.dtemaharashtra.gov.in/scholarships)

सन २०१५-१६ पासुन उपरोक्त योजनांचे येणारे ऑनलाईन नविन/नुतनीकरणाचे अर्ज भरतेवेळी विदयार्थ्यांनी आपला आधार कार्ड क्रमांक अचुक भरावे व बँके कडुन आधार कार्ड क्रमांक आपल्या स्वत: च्या बँक खात्याशी **संलग्न (Seeding)** करुन खात्री करुन घ्यावी. ज्या अल्पसंख्यांक विदयार्थ्यांनी आधार कार्ड काढले नाहीत त्या विदयार्थ्यांनी आतापासुनच आधार कार्ड क्रमांक व स्वत:चे बँक खाते काढुन घ्यावे जेणे करुन शिष्यवृत्ती मंजुर झाल्यानंतर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करणे सुलभ होईल. तसेच,

सर्व तांत्रिक व व्यवसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थाच्या प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की, त्यांनी व्यक्तीश: लक्ष घालून संस्थास्तरावर विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाची नोंदणी करण्यासाठी संबंधीत यंत्रणेशी संपर्क साधुन विशेष मोहिम राबवावी व सदरची कार्यवाही २ महीन्याच्या आत पुर्ण करावी व त्याचा अहवाल या संचालनालयास पाठविण्यात यावा. सन २०१५-१६ पासुन विदयार्थ्यांकडुन ऑनलाईन अर्ज भरतेवेळी आधार कार्ड क्रमांक व संलग्न बँक खात्याची माहीती अचुक राहील या बाबतची सुचना विदयार्थ्यांना आपल्या स्तरावर दार्शनिक सुचना फलकावर लावुन कळविण्यात यावे तसेच विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये भरलेली माहीती संस्थांनी काळजीपुर्वक तपासावी व **अचुक असल्याची** खात्री करुन ऑनलाईन कन्फर्म करावे जेणेकरुन अल्पसंख्यांक विद्यार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित राहणार नाही.

(सही)
( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

---

**<u>अतितात्काळ</u>**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/अल्प.शिष्य./२०१५/ 1026
- 4 APR 2015

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर संस्था, नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील सर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या बँक खाते व आधार कार्ड सलंग्नीकरणाबाबतची वरील परीपत्रकाप्रमाणे करण्यात यावी.

(सही)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर